# अमरावती महानगरपालिका, अमरावती
# स्वच्छता विभाग

<u>विषय :- स्वच्छता विभागा अंतर्गत साफ सफाईच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत.</u>

- स्वच्छता विभागा अंतर्गत एकुण 22 प्रभागा मध्ये दैनंदिन साफ सफाईचे कामे मनपाने नेमुन दिलेल्या कंत्राटदारा मार्फत करण्यात येत आहे. प्रत्येक कंत्राटदारा कडे एकुण 55 कंत्राटी कामगार कार्यरत आहे. दैनंदिन साफ सफाई करारनाम्याच्या अटी शर्ती नुसार प्रत्येक कंत्राटदारा कडे 6 GPS कार्यान्वीत वाहने आहेत असे शहरा मध्ये एकुण 136 वाहने कार्यान्वीत आहेत. 1 ते 22 कंत्राटदारांचे प्रभागा मध्ये साफ सफाई बाबत स्वतंत्र तक्रार निवारण केंन्द्र कार्यान्वीत आहेत.

- शहरातील दैनंदिन साफ सफाई करण्याकरीता बिटप्युन सह एकुण 623 म.न.पा.चे स्थायी कामगार तसेच कंत्राटदारचे एकुण 1265 कामगार असे एकुण 1,888 कामगार कार्यरत असुन त्याच्या द्वारे शहरातील साफ सफाई, स्वच्छता गटारे साफ करणे इत्यादी  कामे करण्यात येते. त्या सर्व कांमगाराना आवश्यकते नुसार सुरक्षा साधने पुरविण्या येते.

- दैनंदिन कचरा उचलणाऱ्या कंत्राटदारा मार्फत अमरावती शहरातील कचरा उचलण्यात  येतो,  सदर कंत्राटदाराकडे  एकुण 15 डंपर प्लेसर, 30 खुले ट्रक इत्यादी वाहणे आहेत त्या  द्वारे शहरातील कचरा दैनंदिन उचलण्यात येतो,  उचलण्यात येणाऱ्या कचरा हा सुकळी कंम्पोस्ट डेपो व आकोली कंम्पोस्ट डेपो येथे टाकण्यात येतो व सदर कचऱ्यावर शास्त्रोत पध्दतीने खत निर्मीती करण्यात येते.

- प्रत्येक कंत्राटदारा कडे करारनाम्यातील अटी शर्ती नुसार 5 धुवारणी/ 5 फवारणी मशीन कार्यरत असुन त्या द्वारे डास तसेच किटक जन्य आजारचे निर्मुलन करण्यात येते.

- दैनंदिन कचरा उचलणाऱ्या कंत्राटदारा मार्फत अमरावती शहरातील कचरा उचलण्यात येतो, सदर कंत्राटदाराकडे एकुण 15 डंपर प्लेसर, 30 खुले ट्रक इत्यादी वाहणे आहेत त्या द्वारे शहरातील कचरा दैनंदिन उचलण्यात येतो, उचलण्यात येणाऱ्या कचरा हा सुकळी कंम्पोस्ट डेपो व आकोली कंम्पोस्ट डेपो येथे टाकण्यात येतो व सदर कचऱ्यावर शास्त्रोत पध्दतीने खत निर्मीती करण्यात येते.

## ❖ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन :-

- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन करीता SWM 1.0 PMC म्हणुन Mars Planning & Engineering Services कडुन सविस्तर DPR रुपये 37.97 कोटीचा तयार करण्यात आलेला असुन त्याला दिनांक 20/11/2018 रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तसेच त्यामध्ये काही बाबी समाविष्ट करुन अतिम रुपये 40 कोटी DPR तयार करण्यात आलेला होता त्याला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

- सदर DPR मध्ये :-

1. म.न.पा कम्पोंस्ट डेपो सुकळी,आकोली रोड, कोंडेश्वर रोड, येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकीया करणे.
2. सुकळी कम्पोंस्ट डेपो येथे जुन्या असलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रकीया करणे.
3. SLF तयार करणे.
4. बायोगॅस तयार करणे.
5. नागरीका मध्ये स्वच्छता व घनकचरा बाबत जनजागृती करणे. (IEC)

❖ <u>घनकच-यावर प्रक्रीया करणे</u>

- मनपा सुकळी कम्पोंस्ट डेपो व आकोली येथील तयार करण्यात आलेल्या प्रकल्प वर दैनंदिन घनकचरा व्यवस्थापन प्रक्रीया करणे या कामाकरीता मे. गंगा ट्रेडर्स (पी.एच.जाधव) यांच्या सोबत "Design, supply, installation, erection, commissioning of municipal solid waste processing plant along with associated civil works at various locations in Amravati (with operation & maintenance for 3 years). त्या नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रक्रीया माहे सप्टेंबर 2021 पासुन आकोली 100 MT व सुकळी कम्पोंस्ट डेपो येथे 200 MT चा करण्यात येत आहे. त्या करीता कंत्राटदाराना 332 रुपये प्रती टन या प्रमाणे दर देण्यात येते.

- माहे मार्च 2021 पासुन कच-यावर प्रक्रीया करण्यात आलेली आहे, सदर प्रक्रीये मधुन खत निर्मीती Inert Material, RDF, निर्माण होते. खत हे शेतक-याना देण्यात येते. Inert material हे शहरामध्ये रोड बनविण्या करीता तसेच low line areas मध्ये टाकण्यात येते. व RDF हे चंद्रपुर येथील Abuja Cement Factory येथे देण्यात येते.

## ❖ नागरीकामध्ये  दैनंदिन साफ सफाई, स्वच्छता घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कार्यवाही करणे (IEC)

- नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत SBM 1.0 DPR 1 मध्ये नमूद नुसार अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये जनजागृतीचे माहिती, शिक्षण व संवाद (IEC) उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने All India Institute of Local Self Government, Pune (अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे) यांची नियुक्ती करण्यात आली असून यांना सदर काम करणेकरिता दि.10-10-2022 रोजी कामाचे आदेश देण्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सदर कामाकरिता 1.00 कोटी निधी उपलब्ध असून या अंतर्गत शहरामध्ये जनजागृतीच्या अनुषंगाने पथनाट्ये, सांस्कृतिक कार्यक्रम, होर्डिंग/फ्लेक्स, डिजिटल मिडिया, पेंटिंग,क्षमता बांधणी प्रशिक्षण, शालेय उपक्रम, स्वच्छतेबाबत टी-शर्टस वाटप इत्यादी स्वरूपात उपक्रम राबविण्यात येतात. सदर कामाचा कालावधी 3 वर्षाकरिता असून अद्याप पर्यंत 1 वर्ष कालावधी पूर्ण झालेला असून यामध्ये उपरोक्त उपक्रम राबविण्यात आलेले आहेत.

- उर्वरित घनकचरा व्यवस्थापन DPR संबधित संपुर्ण कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करण्यात येते.